।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ. विनोद प्र. पाटील**
कुलसचिव

जा.क्र.कबचौउमवि/०८/ शिष्यवृत्ती / स्वयंम.यो./२०२२-२३ / ५७५ दि.२०/०९/२०२२

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)

प्रति,
१. मा. संचालक / विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणिक प्रशाळा / विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**विषय :- सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी नविन अर्ज व नुतनीकरण अर्ज हे ऑनलाईन भरुन अर्ज (हार्ड कॉपी) सादर करणे बाबत.**

संदर्भ:- मा. सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांचे पत्र क्र. जा.क्र.शावगृ-२०२१/प्र.क्र./का. ४(३)/२५७७ दि. ०४/०७/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी अनुसुचीत जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांसाठी पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचे ऑनलाईन संकेत स्थळ सुरू झालेले असल्याने आपल्या शैक्षणिक प्रशाळा / विभागातील शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये प्रवेशित अनुसूचीत जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांना पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी **www.swayam.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन नवीन अर्ज व नुतनीकरण अर्ज करणेसाठी सुचीत करण्यात येवून ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी व त्यासोबत ऑनलाईन जोडलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची छायांकीत प्रत सोबत जोडून आपल्या स्तरावर तपासून तात्काळ आपल्या सही शिक्यानिशी वित्त विभागातील शिष्यवृत्ती कक्षात पाठवावे म्हणजे विहीत मुदतीत ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करणे सोईचे होईल.

**तसेच सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज सादर करतांना विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यास आधार कार्ड संलग्न करणे तसेच आधार कार्डास मोबाईल क्रमांक संलग्न करुन आधार कार्ड अपडेट करणेबाबत सक्त सुचना देण्यात याव्यात.**

वरिल प्रमाणे सर्व माहिती विद्यार्थ्यांना सुचित करुन सदर योजनेचे अर्ज विहीत मुदतीच्या आत शिष्यवृत्ती विभागाकडे तात्काळ सादर करावे हि विनंती.

**सोबत:- संदर्भिय पत्र**

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY * JALGAON-425001 *

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी
१. मा. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि. जळगाव
२. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
३. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि जळगाव.
४. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
५. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.

☎ कार्यालय : +९१- २५७ - २२५८४०५, २२५७२११ फॅक्स् : +९१- २५७ - २२५८४०६
ई मेल: registrar@nmu.ac.in वेबसाईट : www.nmu.ac.in

522

O.I.G.S.

| | | | |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र शासन | **प्रकल्प अधिकारी,**<br>**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**<br>यावल, जि.जळगाव फोन : (02585) 261432<br>**Email : poitdp.yawal-mh@gov.in** | JAS-ANZ | ISO 9001:2008.<br>Quality Management<br>System. Cert. No. 9960 |

जा.क्र-शावगृ-२०२१/प्र.क्र./का.४(३)/ २५५५ दिनांक-०४/०७/२०२२

अत्यंत महत्वाचे/अतितात्काळ

प्रति,

प्राचार्य कुलगुरु/प्राचार्य

डॉ. महाजन महाविद्यालय जळगाव

ता.----------------जि.जळगाव

विषयः सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या प्रवेश प्रक्रियेबाबत.

संदर्भः-१) आयुक्तालयाचे पत्र क्रमांक शावगृ २०२१/प्र.क्र.०७/का ६(३)/दिनांक ०१/७/२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,वरील संदर्भान्वये पत्रान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचे ऑनलाईन संकेतस्थळ सुरु झालेले असून आपले महाविद्यालयात सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या संबंधित पात्र विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे तसेच सदर विद्यार्थ्यांचे आपल्या लॉगीगला आलेल्या ऑनलाईन फॉर्मची व त्यांनी सोबत जोडलेल्या कागदपत्राची काळजीपुर्वक तपासणी करुन सदरील फॉर्म या कार्यालयाच्या लॉगीगवर तात्काळ व विहीत मुदतीत ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावा

तसेच सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचे ऑनलाईन अर्ज सादर करतांना विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यास आधारकार्ड सलंग्न करणेबाबत सक्त सुचना देण्यात याव्यात कारण विद्यार्थ्यांचे बँक खात्यास आधारकार्ड सलंग्न नसल्यास त्यांची डी.बी.टी.रक्कम त्यांचे बॅक खात्यावर वर्ग होत नाही व त्यामुळे विद्यार्थी डी.बी.टी.पासून वंचित राहतात व तक्रारी उद्‌भवतात.त्यामुळे सदर बाबतीत देखील विद्यार्थ्यांना सुचित करण्यात यावे.

4.7.22

(पी.पी.माहुरे)

सहाय्यक प्रकल्प अधिकारी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

यावल जि.जळगाव

प्रतः-१) मा.आयुक्त,आदिवासी विकास म.रा.नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा.अपर आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.